
# सेवक वार्ता

जून-२०२५

वर्ष -६ अंक- ८

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र


## अरण्य ऋषी पद्मश्री मारुती चित्तमपल्ली विशेषांक



दि. १८ जून २०१५ रोजी अरण्यऋषीं पद्मश्री मारुती चिंतमपल्ली यांच वयाच्या ९३ वर्षी निधन...

**जंगलातील "रानवाटा" पोरक्या झाल्या.**

**सेवक संघ रिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली**




**सेवकची वाटचाल ....**

कोलामार्का संरक्षण राखीव क्षेत्राचा व्यवस्थापन आराखडा तयार करण्याकरिता MoU नुसार प्रथम दोन हप्त्यात रु २.५० लाख + १८ टक्के GST असे रु २.९५ लाख रक्कम सेवक संघास देय होती. सदर रक्कम प्राप्त झाली असून त्याचे वाटप खालीलप्रमाणे सदस्यांना सेवक संघाच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेने करण्यात आले. व्ही. टी. पत्की, विश्वास सावरकर, पी.के. कुलकर्णी विजय खनके, डी मालुसरे, वसंत कामडी , एम. एम. कुलकर्णी, शिरीषअस्थाना, उमेश धोपेश्वरकर, डेटाऑपरेटर, फील्ड स्टाफ (२). या अहवालाची सॉफ्ट कॉपी मुख्य वन्यजीव संरक्षक व उप वन संरक्षक सिरोंचा यांना अवलोकनार्थ व अभिप्रायासाठी पाठवणेत आली आहे.

## वेधक वृत्त

## धुळे सेवक संघ शाखेतर्फे समुपदेशन

धुळे सेवक संघ शाखेतर्फे समुपदेशन द्वारे पती, पत्नी, कार्यालयातील महिला-पुरुष यामधील वाद, विवाद यांचेवर समुपदेशन सेवा counselling services सुरू करण्यात आलेली आहे. धुळे ,जळगाव, नंदूरबार जिल्ह्यातील अश्या वादांवर उपाय करण्याचे हे तंत्र अब्यासु सेवक संघाचे सदस्य यांचे कडेस आहे.ज्यांना कोणाला अश्या वादातील घटना, गैरसमज दूर करून मानसिक तणाव, समाधान मिळवायचे असेल अश्या गरजू व्यक्तींना आम्ही मदत करून त्यांचा पैसा, वेळ, सामाजिक अप्रतिष्ठा होऊ नये म्हणुन प्रयास करतो.

जे कोणी इच्छुक असतील त्यांनी त्यांनी आमचेशी संपर्क करावा.

अनेक आंतर्राष्ट्रीय वाद आज समुपदेशनाने संपू शकतात, युद्ध संपू शकतात. तर आपले का नाही सुट्र शकणार? **Counselling समुपदेशन साठी कोणतेही फी नाहीं हे विशेष आहे.**

संपर्क :

जयप्रकाश पाटील 9405202385

### शिवतीर्थ ज्येष्ठ नागरिक संघ, धुळेतर्फे श्री. जयप्रकाश पाटील, सेवक संघ धुळे यांचे "जागतिक पर्यावरण दिन-५जून " या विषयावर व्याख्यान

शिवतीर्थ ज्येष्ठ नागरिक संघ, धुळे यांचे साप्ताहिक सभेच्या प्रसंगी श्री.जयप्रकाश पाटील, धुळे शाखेचे सचिव व सेवानिवृत्त विवअ, धुळे यांचे "जागतिक पर्यावरण दिन- ५ जून" या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. व्याख्यान ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यालयात संघाचे अध्यक्ष ॲड. जे. टी. देसले यांच्या अध्यक्षतेखाली व उपाध्यक्ष ॲड. एम. एस. पाटील यांची व इतर ज्येष्ठ नागरिक यांची उपस्थिती होती.

श्री. पाटील यांनी जागतिक पर्यावरण दिवसानिमित्त ४५ मिनिटांचे भाषण केले. संघांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि जवळ पास 30 सदस्य ज्यात महिला सुद्धा मोठया प्रमाणावर होत्या. सर्वांनी मन लावून विषय ऐकला.




धुळे शहरात वनविभागाची अनेक कार्यालये व अधिकारी यांची सहजपणे उपलब्धता असतांना, शिवतीर्थ ज्येष्ठ नागरिक संघ यांनी श्री. पाटील सेवक संघ धुळेचे सचिव यांना आमंत्रित करणे आपल्यासाठी ही निश्चित भूषणावह बाब आहे.







शिवतीर्थ ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीबाबत श्री. जयप्रकाश पाटील यांनी कळविलेनुसार माहिती व कामांबंधात केलेले भाष्य खालीलप्रमाणे आहे, जे कुठल्याही संघटन कार्याची ओळख व भविष्य ठरते.

" मी या शिवतीर्थ जेष्ठ नागरिक संघाचा सभासद नाही. या नागरिक संघाची धुळ्यातील संतोषी माता चौकात प्राईम लोकॅलिटीमध्ये जागा व इमारत आहे. हा नागरिक संघ धुळ्यातील जेष्ठांचा जिवंत संघ आहे. बरेच वर्षापासून या संघाचे अध्यक्ष ॲडव्होकेट जे. टी. देसले हे ८०-८५ वर्षाचे माजी न्यायाधीश आहेत. ती शिस्तप्रिय, सन्माननीय, लोभ नसलेली व्यक्ती आहे व आता वकिली करत नाहीत. उपाध्यक्ष जे सुद्धा ८० वर्ष वयाचे असावेत, ते ॲड. एम.एस. पाटील हे देखील जुन्या काळातील नामांकित वकील आहेत व अजूनही वकिली करतात. अत्यंत टापटीपीने राहणा-या या दोन्ही व्यक्ती ह्या संघाचा कारभार पाहत आहेत. जसे की गवळी सर आपला धुळे संघ चालवत आहेत; त्याच शिस्तीने. नागरिक संघाचे दोन्ही महानुभावाचा माझा खूप जास्त कधीही संबंध आला नाही. एकदा फक्त आपल्या सेवक संघाचा कार्यक्रम तिथे घेतला एवढाच आहे.

कार्यक्रमास धुळे शाखेचे सर्वाचे मित्र आणि सर्वात जेष्ठ सदस्य श्री निंबाजी निकुमे यांनी श्री. पाटील विशेष प्रोत्साहन दिल्यामुळे व्याख्यानाला ताकद आली असे श्री पाटील कळवितात.

## सेवक संघ कार्य वृत्तांत.......

## या वर्षीही निसर्ग संवर्धन व संगोपनाच्या संदेशाची पंढरपूर वारी

ह.भ.प. श्री. छल्लारे व जी. के. निकम, जे धुळे शाखेचे सदस्य आहेत ते या वर्षीही पंढरपूर वारीस निघाले असून मनोभावे वारी करतांना निसर्ग संवर्धन व संगोपनाचा संदेश देऊन जन जागृती करीत आहेत. सेवक संघाचे नाव उज्ज्वल करित आहेत. त्याबद्दल श्री. व्ही. टी. पत्की यांनी त्यांच्या या कार्याबद्दल प्रशंसा केली आहे.











## श्री. वि. त्र्यं. पत्की यांचे वन संवर्धनाचे योगदान आजही सुरु






पुणे येथे श्री रमेश पुजारी आणि प्राजक्त हे विनामूल्य शेअर ट्रेडिंग प्रशिक्षण देण्याकामी प्रशिक्षण वर्ग आयोजित करतात. प्राजक्त हे वर्गासाठी मोफत सुविधा प्रदान करतात. २००० पासून आत्तापर्यंत सुमारे १००० व्यक्तींना १९ तुकडीत शेअर ट्रेडिंगचे शिक्षण विनामूल्य दिले आहे.

यावर्षीच्या प्रशिक्षणार्थीकडून या उपक्रमातून तळजाई राखीव वनात ५१ रोपे लागवडीचे लक्ष्य साध्य करुन श्रीगणेशा केला आहे. सेवक संघाचे श्री. वि. त्र्यं. पत्की यांनी रोपवाटिका आणि लागवड तंत्र आणि त्यांच्या देखभालीवर मार्गदर्शन केले. सहभागींकडून मिळालेला प्रतिसाद अत्याधिक आणि उत्साहवर्धक होता. पुणे वनविभागाने कार्य यशस्वी करण्यास मदत केली. पुढील वर्षी मोठे उद्दिष्ठ्य निश्चित केले आहे.




## चितमपल्ली यांच्या स्मृती:

- वि.त्र्यं.पकी.

मी,१९७३ साली ठाणे वनवृत्तातील रोहा वन उपविभागात कार्यरत असताना, दरमहा ठाणे येथे बैठकीस येत असे. माझा प्रवास मार्ग कर्नाळा अभयारण्यातून होता, त्यामुळे अनेक वेळा मी कर्नाळा या लहानशा पक्षी अभयारण्यात जात असे.

श्री. चितमपल्ली त्यावेळी तिथे वनक्षेत्रपाल पदावर कार्यरत होते. त्यांचे भेटीत पक्षी ज्ञान मिळत असे. अतिशय साधी रहाणी, निगर्वी स्वभाव, स्वच्छ चारित्र्य आणि कमी बोलणारे व्यक्तीमत्व होते.

२.संस्कृत भाषा त्यांनी,ते वनक्षेत्रपाल नांदेड असतांना शिकली होती. त्यांचे गुरू, ही भाषा त्यांना सकाळी ४.०० ते ५.०० या वेळात शिकवीत होते. एकही दिवस न चुकता त्यांनी विद्या ग्रहण केली आणि संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवून पक्षीकोश निर्माण केला. जिज्ञासा, चिकाटी आणि अभ्यास यांचा अपूर्व संगम.

३.सेवक संघाने २००७ साली श्री. चितमपल्ली सरांचा सत्कार केला होता, पुणे शहरात. त्याचे अध्यक्ष होते, श्री.मसलेकर साहेब आणि त्या निमित्य सेवकाने प्रसिध्द केलेल्या विशेषांकाचे मुखपृष्ठ (समुद्र गरुड) श्री सुरेश काळे, या पूर्व काळाचे वनाधिकारी यांनी पेंटींग केले होते.ते चित्र श्री. चितमपल्ली यांना येवढे भावले की त्यामुळे भारावून जाऊन, त्यांनी समुद्र गरुड पक्षाबद्दल पंधरा मिनीटे माहिती आपल्या भाषणातून दिली.रसाळ भाष्य व अमृताची गोडी असलेले ज्ञान होते.

४.त्यांची व माझी शेवटची भेट सोलापूरला, त्यांचे निवासस्थानी २५ मार्च २०२५ रोजी झाली. त्यांचा सत्कार करून मानचिन्ह अर्पण करण्याचे भाग्य मला सेवक संघाने दिले. एक हाडाचा निसर्ग अभ्यासक, उत्तम लेखक आणि सात्विक ऋषी आपल्यात आता नाही. परंतु त्यांचे कार्य सदैव स्मरणात राहील. "जन पळभर म्हणतील हाय हाय, मी जाता राहील कार्य काय ?" त्यांचे कार्य पुढे चालू ठेवणे हीच त्यांना खरी आदरांजली होईल.

•◈•• ••◈••

## असा अरण्यऋषी परत होणे नाही.

- अंबरीष मोरे

अरण्यऋषी पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचे आज ९३ व्या वर्षी निधन झाले.

१३ विविध भाषांचे ज्ञान असलेले, वनखात्यात ३६ वर्ष सेवा करून, विविध आदिवासी जमातींच्या संपर्कात राहुन, विविध जंगलांमध्ये फिरून मिळवलेला प्रचंड ज्ञानाचा सागर त्यांनी पुस्तक रूपाने लोकांपर्यंत पोहोचवला. आजही नाशिकच्या आसपासच्या जंगलांचा अभ्यास करताना त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांमधील

**कितीतरी गोष्टी उपयोगास येतात. माझं अत्यंत आवडते लेखक. भावपूर्ण श्रद्धांजली.**

## अरण्यांच्या ज्ञानाचा भंडार

- **विवेक सावंत**

**मला मारुती चित्तमपल्लीना भेटायचा योग आला, सरळ साधा माणुस अरण्यांच्या ज्ञानाचा भंडार, त्यांच्या एका पुस्तकात माझ्या गाव प्रदेशाचा ऊल्लेख केला आहे, आबेंतच्या खाडीचा तेथील वन्यजीव व खाडीप्रदेश अभ्यास केलाय।ते साहीत्य संमेलनाचे अध्यक्षही होते. भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो ,वन्य साहीत्यप्रेमींच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.**

## आमचे मारुती अण्णा

-श्वेतुष..

"आज तो कायमचा गेलाय आपल्याला एकटे टाकून. ह्या क्रूर माणसांच्या जंगलात आता आपला वाली कोण?,हे गजानना,आता आम्ही कोणाकडे बघून जगायचे? बोलता बोलता त्या प्रौढवयीन अर्जुनचा हुंदका दाटून आला.

तो ह्या मेळघाटच्या जंगलात आला तेव्हा अगदी पिल्लु होता. आफ्रिकेतल्या कुठल्यातरी देशाबरोबर झालेल्या ॲनिमल एक्सचेंज करारानुसार तो भारतात ,या मेळघाटच्या जंगलात आला होता .

"मला सगळच नवीन होतं. दोन दिवसाच्या जेट लॉग नंतर इथल्या टाइम झोनला मी थोडा सरावला. बरं इकडे खाण्या पिण्याच्या ,जगण्याच्या सर्वच गोष्टी वेगळ्या होत्या. तिकडे माझ्या देशात अमेझॉनचे पाणी आणि इकडे मेळघाटात तापी माईचे पाणी. बरं इथे खायला मिळणारे गवत झाडपाला तो देखील वेगळा होता .पहिला आठवडा तर भारतातून पळूनच जावे असं वाटायचे. मी एकटाच तळ्याकाठी रडत बसायचो. अश्या वेळी अचानक मारुती अण्णा आले आणि खरं सांगतो भावांनो,मला आतून जाणवला प्रेमळ स्पर्श, आपुलकीचे दोन शब्द. मी आहे रे असे आश्वासन देणारा. अण्णांनी माझ्या सोंडेवरून प्रेमाने हात फिरवला. हळू हळू मी मेळघाटात रुळू लागलो. सोबतीला तुम्हीं सर्व होतात. मारुती अण्णा, प्रकाश काका, आमचे हौशीने फोटो काढणारे सलीम सर, माणसाच्या अतिक्रमणातून आमची घरं, वृक्ष वाचविणारे सुंदरलालजी. तुमच्या आजुबाजूला तुमची काळजी करणार हात असले की जगण्याला बळ येते. आधार वाटतो. आज त्याच साखळीतीलअण्णा गेलेत" भारदस्त अर्जुन तर भर शोकसभेत भडाभडा रडू लागला.

अर्जुनाला सावरायला एक गंप्या नावाचे वानर पुढे आले. मारुती अण्णांच्या फोटोला अभिवादन करून बोलू तो लागला. "नमस्कार मारुती राया आणि नमस्कार मारुती अण्णा. आमचा अरण्यातला ऋषी आम्हाला कायमचा सोडून गेलाय रामराया कडे. जातस्य हि ध्रुवो मृत्यू हा तर सृष्टीचा नियम. अण्णा याला अपवाद कसे ठरणार हो? पण त्यांनी उभं आयुष्य आमच्यासाठी खर्ची घातले. आमचाच अभ्यास, आमचाच ध्यास. निसर्गाचा समतोल बिघडतोय. आमच्या जगण्यात खाण्यापिण्यात आमूलाग्र बदल होताय. जे आमच्या पचनी पडणारे नाहीत. अहो आज माणसं आम्हाला कोल्ड्रिंक्स देतात, वेफर्स देतात पण ती आमची खाद्यशैली नाही, जीवनशैली नाही हे अण्णा समाजाला आजन्म सांगत राहिले. आमची वजन भरमसाठ वाढली, झाडावरून तोल जाऊन मृत्यू होऊ लागले. आमच्या कपिला गाईच्या पोटातून पाचदहा किलो प्लॅस्टिकचा कचरा निघतो. त्याही पुढे जाऊन काही क्रूर माणसं गर्भिण हत्तिणीला स्फोटकं देऊन मारतात? तिकडे दूर मधुमलाईच्या जंगलात लाखो रुपयांसाठी केवळ दातांच्या तस्करीसाठी हजारो हत्ती मारले जातात, चंदनाची झाडे कापली जातात? सांगा तेथे राहणाऱ्या हजारो सापांनी कुठे जायचे? केवळ एका सणासाठी लाखो बकऱ्यांची कुर्बानी देणारा धर्म खरोखर धर्म आहे का? हे सर्व आता कोण बदलणार? अण्णा, तुमच्यापाठी हा अरण्य संसार कोण आणि कसा चालवणार?"

आता एक खारुताई पुढे येते. तिच्या तोंडातील कणभर मातीने एकेकाळी रामसेतू भरला गेला होता. आजही पाठीवर मिळालेली प्रभू रामचंद्रांची प्रेमळ थाप अभिमानाने मिरवणारी खारुताई. खारुताईने तोंडात एक बदाम बीज आणले अण्णांच्या फोटो समोर ठेवले आणि म्हणाली,"अण्णा,खरं सांगू आम्ही विसरून ठेवलेल्या बिया झाडं बनतात. माणसासारखा अल्झायमर का काय आजार आहे का हा? नाही. ती देवाची रचना असेल. पण आज जंगल निर्मिती थांबली आहे. आम्ही ही कारणीभूत असू कदाचित. पण अण्णा, तुम्ही आयुष्यभर इतके शिकवले. जगायचे सूत्र, निसर्गाचा समतोल, कुठेतरी थांबायचं सर्व काही. तुमच्याकडे पाहून आम्हाला वाल्मिकी ऋषी आठवतात. तेव्हा त्यांच्या आश्रमात मिळणारी ती प्रेमाची ऊब ती सुरक्षितता आम्ही अण्णा तुमच्यात अनुभवली. पण आपण काही मंडळी सोडली तर आमचे भविष्यातील अस्तित्व काय? लुप्त होत चाललेले आमचे असंख्य सवंगडी कोण वाचवणार? Save tiger वैगरे आहे, पण हे सृष्टी चक्र बॅलन्स कसं करायचं? हा मानव त्याचा विकासासाठी आमच्या मुक्या जीवांवर का उठतो आहे,?आजार तुमचे रोग तुमचे तरी लस चाचणी, वॅक्सिंग चाचणी उंदीर, माकड ह्यांच्यावर का?रस्त्यावरील मोकाट कुत्री म्हणून त्यांचीच अमानुष हत्या करणारा माणूस अंतराळात पाठवायला ह्यांना कुत्री लागतात, कोणाचे नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट घेतले त्या अंतराळ संस्थेने? श्रीकृष्णाच्या गीतेत आमच्या विभूती आहेत ना, ऐरावतं गजेंद्र म्हणतात ना. मग इतकी कृतघ्नता का? अण्णा आपण गेलात आम्हाला पोरके करून. आता आमच्या तक्रारी आम्ही कोणाकडे करायच्या ?

चिमुकल्या खारुताईचे ते सात्विक संतापाने पेटलेले आणि अण्णांच्या जाण्याने शोकाकुल रूप प्रथमच सर्वांना दिसले.

आता बराच वेळ झाला होता. खोप्यात, पडवीत, गुहेत, बिळात, ते सर्व आपल्या लेकरांना ठेवून आले

होते. सर्वांनी अरण्य ऋषींना त्यांच्या आधारवृक्ष अण्णांना अश्रुपूर्ण नयनांनी शेवटचा नमस्कार केला.
लव्ह यु मारुती अण्णा.
लव्ह यु जिंदगी.

•◈•• ••◈•

## मारुती चितमपल्ली, निसर्ग लेखक

संकलन- म.आ. सैंदाणे
से.नि. वि.व.अ. (पुणे.)

मा. मारुती चितमपल्ली यांचे टोपणनाव अरण्यऋषी, जन्म ५, नोव्हेंबर १९३२. सोलापूर . कार्यक्षेत्र वन्यजीवाभ्यास, भाषा मराठी साहित्य, माहितीपूर्ण लेखन विषय निसर्ग. "पक्षी जाय दिगंतरा"चा प्रभाव गो. नी. दांडेकर. पुरस्कार पद्मश्री.

वनाधिकारी म्हणून दीर्घकाळ म्हणजे ३६ वर्षे नोकरी. नोकरी दरम्यान आणि त्यानंतरही अशी एकूण ६५ वर्षे जंगलात काढणारे चितमपल्ली, जंगलातील प्राणीजीवन आणि त्याचे बारकावे रेखाटणारे लेखन अतिशय ओघवत्या शैलीत केले आहे. त्यांचे वाचन प्रचंड होते. आणि त्यांना पुस्तकांचीही आवड होती. पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली, लेखक व्यंकटेश माडगूळकर तसेच प्रसिद्ध चित्रकार ए. ए. आलमेरकर यांच्याशी त्यांचा स्नेह होता.

### बालपण

चितमपल्ली यांचा जन्म सोलापुरातला. त्यांचे वास्तव्य गुजराथीमिश्रित मराठी बोलणाऱ्यांच्या वाड्यात होते. त्यांचे आजोबा सोलापुरातल्या बुधवार पेठेत राहत. तेथे तेलुगू बोलणाऱ्यांची वस्ती होती. मुस्लिमबहुल वस्तीही जवळच होती. त्यामुळे आई वडील आणि मुले मराठी, गुजराती, तेलुगू आणि उर्दूमिश्रित हिंदी बोलू लागले.

पाचव्या इयत्तेतील स्कॉलरशिपमुळे अकरावीपर्यंत महिना दहा रुपये मिळत असल्याने मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मोफत झाले. भर तापात परीक्षा देऊनसुद्धा मारुती चितमपल्ली वर्गात पहिल्या नंबराने पास झाले.

महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर चितमपल्लींनी त्यांची वही मराठीच्या प्राध्यापकांना दाखवली, आणि तिच्यातली एक कथा महाविद्यालयाच्या नियतकालिकात प्रकाशित झाली.

त्यांच्या वडिलांना वाचण्याची आवड तर आईला अरण्यवाटांची. आई, वडील, आत्या, मामा यांच्याबरोबर रानवाटेने चालताचालता मारुती चितमपल्लींना जंगलांबद्दल आकर्षण वाटू लागले. 'क्षणोक्षणी पडे, उठे, परि बळे उडे बापडी' ह्या कवितेतील कारुण्य शाळेत असताना जाणवले, आणि जंगलांतील पक्ष्यांविषयी प्रेम वाटू लागले. आयुष्यभर हरणाची शिकार करणाऱ्या भीमाचा मृत्यू हरणासारखा तडफडत झाला,ही आईने सांगितलेली गोष्ट आयुष्यभर विसरता येण्यासारखी नव्हती. आईला पशुपक्ष्यांची खूप माहिती होती. चंडोल ऊर्फ माळचिमणी, कोकिळा ऊर्फ कोयाळ, सातबहिणी ऊर्फ बोलांड्या, लावा ऊर्फ भुरगुंज्या अशी कितीतरी नावे चितमपल्लींना आईकडून ऐकायला मिळाली. हरणाच्या नराला काळवीट आणि लांडग्याच्या मादीला लासी असा नर-मादीतला फरक तिनेच शिकविला. माळढोक हे नाव पहिल्यांदा आईनेच ऐकवले. तिने दिलेले रंगांच्या छटांचे ज्ञान पाखरांच्या आणि फुलपाखरांचे वर्णन करताना मारुती चितमपल्लींच्या उपयोगी पडले.

आईनंतरचे गुरू

लिंबामामा हा मारुती चितमपल्लींचा अरण्यविद्येतला २रा गुरू. प्राणी, पक्षी, वनस्पती तो न बोलता नजरेने दाखवी. वीण झाल्यानंतर सोडून दिलेली सुगरण पक्षाची घरटी त्यानेच दाखविली. त्याच्याबरोबर रानातून चालताना रुई, धोतरा, निवडुंगाची माजलेली झुडपे आणि बोरी, बाभळी, निंबाची काटेरी झुडपे चुकवत चालावे लागे. त्या झाडाखालून चितमपल्लींनी होल्यांची घरटीही शोधली. फुलपाखरांच्या मागे जात गवतामधील किटकांचे संगीत ऐकायला ते तिथेच शिकले.

अरण्यवाटेवर आणखी एकाने, (हणमंतामामाने) चितमपल्लींना जंगलाचे न्यारे जग शिकवले पाखरांची नावे त्यानेच सांगितली. तळ्याकाठी पाखरांची पिसे सापडायची. पारी, पोपटी व उदी रंगाची पिसे पाहून हणमंतामामा पाखरांची नावे सांगायचा. मामा खांद्यावर कुदळ घेऊन उंच वारूळ शोधत चालायचा. या वारुळांना ते टेकराज म्हणत, पण हे वारूळ म्हणजेच सापांचे घर कधी दिसले नाही. हणमंतामामाजवळ सापांविषयी खूप ज्ञान होते. विषारी, बिनविषारी सापांपासून तर सापांच्या जाती ओळखण्यापर्यंत आणि सापांची अंडी असे सारे काही चितमपल्लींना हणमंतामामाकडूनच शिकायला मिळाले.हणमंतामामांनी चितमपल्लींना वन्यप्राण्यांच्या असंख्य लोककथा सागितल्या, आणि तेच ज्ञान पुढे वनखात्याच्या नोकरीत कामी पडले. मामाची अंधश्रद्धाच चितमपल्लींना पशुपक्ष्यांविषयीच्या संशोधनासाठी कारणीभूत ठरली. काय खरे आणि काय खोटे
हे ओळखता येऊ लागले.

मारुती चितमपल्लींचे रानाविषयीचे माझे प्रेम आई, माळकरीण आत्या, लिंबामामा आणि हणमंतमामा यांनी जोपासले. त्यांच्यामुळे चितमपल्लींना वन्यजीवशास्त्र उलगडले.

### महाविद्यालया नंतर

पारंपरिक कॉलेज शिक्षणात असताना नंतर मारुती चितमपल्ली यांनी वानिकी महाविद्यालयाची वाट धरली. पुण्यातील विभागीय वनाधिकारी कार्यालयात अर्ज सादर केला. सोलापूरचे राहणारे वनक्षेत्रपाल मा. एम.डी. गाडगीळ यांची पुण्यातील वनसंशोधन केंद्रात भेट घेतली. त्यांनी वनक्षेत्रपालाच्या निवडीसाठी होणारी लेखी परीक्षा, त्याची पूर्वतयारी याविषयी चितमपल्लींना मार्गदर्शन केले. विद्यापीठ परीक्षेचा निकाला आधि वानिकी महाविद्यालयातील प्रवेशासाठी सर्व परीक्षा गंभीरपणे देण्याचा निर्धार त्यांनी केला. मुलाखतीला कशी उत्तरे द्यायची हे गाडगीळ यांनी सांगितले होते. सोळा मैल चालण्याच्या परीक्षेचा सरावही केला. त्यासाठी आई, मामांसोबत लहानपणी केलेली रानभटकंती उपयोगी ठरली. एकीकडे विद्यापीठ परीक्षा

सुरू असतानाच मुख्य वनसंरक्षकांकडून मुलाखतीकरिता बोलावणे आले. मा. जे.ए. सिंग यांनी त्या वेळी मुलाखत घेतली होती. मुलाखतीत यश मिळाले आणि सोळा मैल चालण्याची परीक्षाही यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्यामुळे वानिकी महाविद्यालयातील प्रवेशाची निश्चिती मिळाली. अपेक्षित होते तेच झाले आणि मारुती चितमपल्लींची कोईमतूरच्या (तामीलनाडू) सदर्न फॉरेस्ट रेंजर्स कॉलेज या वानिकी महाविद्यालयात दोन वर्षांच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली.

या वानिकी महाविद्यालयात प्रवेश झाला आणि मारुती चितमपल्ली यांचे आयुष्य एका वेगळ्या वाटेने पुढे जाऊ लागले.

### वानिकी महाविद्यालय

शिस्त काय असते हे त्यांना या महाविद्यालयाने शिकवले. पहाटे उठणे, ठरलेल्या वेळेनुसार सर्व काही करणे सुरू झाले. वानिकी महाविद्यालयात असताना पहिल्यांदा त्यांनी वनातला अभ्यास दौरा केला. जंगलात राहायचे म्हणजे तंबूत, महिनाभर लागणारे सारे सामान सोबत, असे सारे काही कुतूहलमिश्रित होते. प्रवेश घेताना १६ मैलांची अट जशी कायम होती, तशी मॅरेथॉन रेसमधून महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना १६ मैलांचे अंतर धावत धावत चार तासांत पूर्ण करावे लागे. वनाधिकारी म्हणून तंदुरुस्त आहात की नाही याची ती चाचणी होती. मात्र, पहिल्याच वर्षी मॅरेथान रेसमध्ये धावताना मेंदूतील रक्तस्रावामुळे एका सहकाऱ्याचा मृत्यू झाला. त्याचे कुटुंबीय वेळेत पोहोचू न शकल्याने महाविद्यालयातर्फे विद्यार्थी व शिक्षकांनी मिळून अंत्यविधी पार पाडला. भविष्यात वनाधिकाऱ्याला कशा प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागू शकते, याचे दाहक वास्तव मारुती चितमपल्लींनी विद्यार्थिदशेतच अनुभवले.

### वनखात्याची नोकरी

मारुती चितमपल्लींना वनखात्यातील नोकरीत ज्येष्ठ पक्षितज्ज्ञ डॉ. सलीम अलींचा सहवास खूप काही शिकवून गेला. वनखात्यातील नोकरीच्या निमित्ताने चितमपल्लींनी अनेक ठिकाणचे जंगल पिंजून काढले. पश्चिम महाराष्ट्रात १५ वर्षे नोकरी केल्यानंतर ते विदर्भात नवेगाव बांधला आले. त्यानंतर नागझिरा, नागपूर, मेळघाट येथली जंगले अनुभवली. मात्र त्यांना नवेगावबांधचे जंगल अधिक आवडले. शिकारीसाठी येणारे माधवराव पाटील त्यांनी तेथेच भेटले. शिकारीच्या निमित्ताने आपल्या सोबत्यांकडून माधवराव वनविद्या शिकले आणि ही वनविद्या त्यांच्याकडून चितमपल्लींना शिकता आली. मात्र, ही वनविद्या साध्य करायला त्यांना अनेक वर्षे लागली.

### संस्कृतचा अभ्यास

मारुती चितमपल्ली यांनी परंपरागत पद्धतीने संस्कृत साहित्याचे अध्ययन केले आणि त्यानंतर जर्मन आणि रशियन भाषांचा अभ्यास केला.

रामटेकच्या कालिदास संस्कृत विद्यापीठाच्यावतीने प्राचीन भारतीय साहित्यातील पर्यावरण असा एक प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविला जातो. चितमपल्ली यांनी ८४व्या वर्षी त्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आणि तो अभ्यासक्रम पूर्णही केला.

### मराठी भाषेला शब्दांची देणगी

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इंग्रजी शब्दांना मराठीत दिलेले पर्यायी शब्द आज रुळलेत. तसेच कार्य जंगलाच्या बाबतीत मारुती चितमपल्ली यांनीही करून ठेवले आहे. अरण्य आणि त्याभोवताल विणल्या गेलेल्या विश्वातील कितीतरी घटकांना चितमपल्ली यांनी आपल्या शब्दांमध्ये गुंफले आहे. पक्षी असोत की वनस्पती, कितीतरी नवी नावे केवळ त्यांच्यामुळे मराठी साहित्यात नोंदली गेली आहेत. चितमपल्लींनी पक्षिशास्त्रातील अनेक संज्ञांचे मराठी नामकरण केले आहे. जसे कावळ्यांच्या वसाहतीला इंग्रजीत रूकरी असा शब्द आहे. चितमपल्लींनी त्यासाठी काकागार हा शब्द योजला. तसेच हेरॉनरी (बगळे,ढोकरी ह्या पक्ष्यांची वीण वसाहत)ला सारंगागार असा समर्पक शब्द मराठीत तयार केला आहे. रूस्टिंग प्लेससाठी रातनिवारा हा शब्द वापरला आहे.

टणटणी (घाणेरी)चे रायमुनिआ (हिंदीभाषक) तर बहाव्याचे अमलताश हे नाव चितमपल्लींमुळे नागरी वाचकांस माहित झाले.

### संशोधन आणि संस्थांमधील सहभाग

मारुती चितमपल्ली यांनी वने, वन्यप्राणी, वन्यजीव व्यवस्थापन, आणि पक्षिजगताविषयी उल्लेखनीय संशोधन केले; आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग आणि निबंधवाचन केले. सेवाकाळात आणि निवृत्तीनंतर अनेक संस्था, समित्या यांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. राज्य वन्यजीव संरक्षण सल्लागार समिती, मराठी अभ्यासक्रम समिती (औरंगाबाद)चे ते सदस्य होते. तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचेही ते संचालक होते.

### वन्यजीव लेखन

मारुती चितमपल्ली यांना त्यांच्या निसर्ग क्षेत्रातील अभ्यासामुळेच पक्षितज्ज्ञ व निसर्गलेखक ही ओळख मिळाली, आणि त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली.

आनंददायी बगळे (संस्कृत साहित्यातील काही पक्षी), (२००२)
चकवाचांदण : एक वनोपनिषद, (आत्मचरित्र)
रातवा, (१९९३), (चा महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार)
नवेगाव बांधचे दिवस
आपल्या भारताचे साप
केशराचा पाऊस
घरट्यापलीकडे, (१९९५)
चित्रग्रीव - एका कबुतराची कथा
चैत्रपालवी, (२००४)
जंगलाची दुनिया (२००६)
निळावंती, (२००२)
निसर्गवाचन
पक्षिकोश, (२००२)
पक्षी जाय दिगंतरा, (१९८३)
मृगपक्षिशास्त्र, (१९९३)
शब्दांचं धन, (१९९३)

सुवर्णगरुड, (२०००)
रानवाटा,१९९१-९२चा महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार),
जंगलाचं देणं, (१९८५) (महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार प्राप्त-१९८९),
(विदर्भ साहित्य संघ पुरस्कार-१९९१)

## पुरस्कार आणि सन्मान

पद्मश्री (२०२५)
नागपूरच्या फोरमचा नागभूषण पुरस्कार (२००८)
खासदार एस.डी. पाटील समाजसेवक पुरस्कार
२०१२ सहकारमहर्षी (कै) शंकराव मोहिते पाटील प्रतिष्ठानचा 'सहकार महर्षी साहित्य पुरकार'
रानवाटा - ह्या पुस्तकाला ९१-९२ सालचा उत्कृष्ट साहित्यानिर्मितीचा राज्य पुरस्कार.
इ.स.२००६ मध्ये सोलापूरला झालेल्या ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद.
महाराष्ट्र राज्याच्या कडून दिलेला विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार (२०१७)
१२व्या किर्लोस्कर चित्रपट महोत्सवाचा जीवनगौरव पुरस्कार (८-१-२०१८)

## मारुती चितमपल्ली याचे सुविचार

1. " थकलेल्या माणसाची वाट अन् झोप नसलेल्या माणसाची रात मोठी असते."
2.निसर्ग हा पुस्तकांपेक्षा मोठा गुरू आहे, ते सतत शिकवतो आणि सतत नव्याने समजतात.
3. पक्ष्याचे किलबिलाटात
माणसाने शांत रहायला शिकाव.
4. माणसाने निसर्गाकडे पहाण्याची नजर बदलली की, ता देवाकडेही नव्याने पाहू लागतो.

मारुती चितमपल्ली अरण्यऋषीं पद्मश्री मारुती चिंतमपल्ली यांच वयाच्या ९३ वर्षी दुःखद निधन...
जंगलातील "रानवाटा" पोरक्या झाल्या
विनम्र अभिवादन.......

•◈•• ••◈••

आवड असणाऱ्यांनी अवश्य वाचावीत अशी श्री. मारुती चितमपल्ली यांनी लिहिलेल्या 14 पुस्तकांचा सेट आहे. सुंदर पुस्तके आहेत.

•◈•• ••◈••

## जंगलचा माणूस जंगलात निघून गेला.

लेखक.. डॉ संदीप गजानन श्रोत्री,

रानवाटा, सातारा

शेवटी अपेक्षित बातमी ही आलीच. आठ दहा दिवस अन्न सेवन वर्ज्य केलेले मारोतराव आपल्यातून निघून गेले.

नवी दिल्लीहून पद्म पुरस्कार घेऊन परत आले, ते बहुदा मनाशी कोणत्यातरी निश्चय करूनच. माणसांच्या जंगलात रमणारा तो माणूस नव्हताच. असं म्हणतात की जंगलातला माणूस बाहेर येऊ शकतो परंतु माणसातलं जंगल हे कधीच दृष्टी आड होत नाही. मारोतरावांच्या बाबतीत हे त्रिवार सत्य आहे.

ही व्यक्ती केवळ जंगलाचा अभ्यास करणारी नव्हती, केवळ जंगल निरीक्षण करणारी नव्हती, केवळ प्राणी पशु पक्षी फुले झाडे वनस्पती यांच्या नोंदणी करणारी नव्हती,

केवळ पोटासाठी नोकरी वनखात्यात केली म्हणून कर्तव्य बजावणारी नव्हती, तर ती जंगलाशी एकरूप होणारी होती. चितमपल्ली आणि जंगल हे दोन्ही समानार्थी शब्द आहेत. मारोतराव हे जंगलाचा एक भाग म्हणून राहणारे होते किंबहुना ते बनलेलेच होते.

जंगलातले पशुपक्षी प्राणी हे त्यांचे सहचर तर होतेच परंतु संपूर्ण जंगल हाच एक मोठा सजीव आहे, संवेदनशील असा एक प्राणी आहे, त्याला त्याचे स्वतःचे मन असते, त्याला त्याचे स्वतःचे मत असते, हे त्यांचे अनुभवांती तयार झालेले ठाम मत होते. सत्तर वर्षांचा या फिल्ड अभ्यासाशिवाय त्यांचा जंगलाशी संबंधित वाङ्मयाचा सखोल अभ्यास होता. त्या अभ्यासाची खोली ( डेप्थ) ही एखाद्या ऋषीमुनीला लाजवेल इतकी सखोल होती. अगदी ऋग्वेद, उपनिषदां पासून आधुनिक इंग्रजी वाङ्मयापर्यंत अनेक हजारो पुस्तके त्यांनी वाचली होती.

पहाटे तीन साडेतीनला उठून त्यांचे वाचन चिंतन आणि मनन सुरू व्हायचे. त्यांचे लेखनही सामान्य वाचकाच्या मनाला भिडणारे होऊ लागले. त्या लेखनाचे वाचक आणि खूप कौतुक केले, सुरुवातीसुरुवातीला त्यांचे अनुभव हे अत्यंत अनपेक्षित आणि विस्मयकारी असायचे, कुतूहल जागृत करणारे होते. अनेकांनी त्यांना विचारणा केली असता त्यांनी त्यांचे म्हणणे साधार पटवून द्यायचे.
त्यांच्या लेखनाचे पुस्तकांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य हे होते की निसर्गविषयक विज्ञानाचे ते उत्तम ललित भाषेत लिहिणारे लेखक होते.
वाचकाला जंगलाकडे आकर्षित करणारे सामान्य माणसाला जंगलाबाबतचे कुतूहल वाढवणारे आणि पर्यायाने जंगल आणि पर्यावरण वाचवायला उद्युक्त करणारे असे ते लोकप्रिय लेखक होते.
त्यांच्या पुस्तकांना अनेक पुरस्कार मिळाले अगदी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद देखील त्यांना प्राप्त झाले.
अगदी अलीकडे त्यांना पद्म पुरस्कार देखील लाभला.
त्यांच्या साहित्याचा तर मी एक भाट होतोच, एकनिष्ठ भक्त देखील आहे.

त्यामुळे त्यांची वारंवार भेट घेणे त्यांच्या सहवासात जास्तीत जास्त वेळ काढणे त्यांच्याबरोबर जंगल भटकंती करणे याची संधी मी सोडत नव्हतो.

रानवाटा निसर्ग आणि पर्यावरण संवर्धन मंडळाची स्थापना झाल्यानंतर लगेचच सातारा येथे त्यांना आम्ही चार दिवस मुक्कामी आणले होते त्यांची जाहीर मुलाखत नगर वाचनालयाच्या पाठक हॉलमध्ये मी

आणि तेव्हाचे उपवनसंरक्षक श्री सुनील लिमये यांनी घेतली होती.
त्यानंतर मी त्यांना घेऊन कास पठाराला गेलो होतो वासोटा जंगलात आम्ही जाऊन अरण्य वाचनाचे धडे घेतले होते.
पुढे ते कोकणामधील हरणे येथे सागरी जैवविविधतेचा अभ्यास करण्यासाठी मुक्काम ठोकून होते. सातार्‍यामध्ये देखील त्यांचा लेखनासाठी म्हणून मुक्काम बरेच दिवस होता.
औंध येथील ग्रंथालयामधील काही दुर्मिळ पुस्तके त्यांच्यासाठी आम्ही झेरॉक्स प्रती करून आणली होती. पुढे ते नागपूरला स्थायिक झाले आणि नागपूर येथे माझे वारंवार जाणे असते त्यावेळी त्यांची भेट व्हायची. माझ्या लेखनाचे पुस्तकांचे त्यांनी भरभरून स्वागत केले होते. खूप कौतुक आणि प्रोत्साहन देत होते. मी त्यांना सांगायचो की त्यामध्ये आपलीच प्रेरणा आहे. आपणच माझे आदर्श आहात.
नागपूरहून ते आजारपणामुळे पुणे आणि नंतर सोलापूर येथे आल्यावर देखील माझे तेथे जाणे होत होते आणि आता मात्र डॉक्टर आणि पेशंट असेही नाते तयार झाले होते.
निसर्ग गुपिते या माझ्या पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन त्यांनी त्यांच्या घरी सोलापूर येथे काही महिन्यांपूर्वी केले होते.

सोलापूर मधील त्यांच्या घरासमोरच एका नवीन बांधकाम चालू असलेला इमारतीमध्ये त्यांचे 30,000 पुस्तकांचे अफाट ग्रंथालय उभे राहत आहे ते त्यांनी स्वतः मला दाखवले होते. त्यांच्या मनातील इच्छा अशी होती की हे ग्रंथालय संपूर्णपणे मोफत चालवण्यात यावे. अट एकच पुस्तके घरी न नेता तेथेच बसून वाचावीत.

हे त्यांचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण सर्वांनी झटले पाहिजे.

त्यांच्या वाङ्मयावर अरण्य वाचनावर आणि अनुभवांवर अनेकांनी लिहिले आहेत त्यामुळे ते मी पुन्हा येथे लिहीत नाही परंतु त्यांच्या दिल्लीहून परत आल्यावर अन्न पाणी त्यांनी वर्ज केले आणि स्वतःहून ते निघून गेले.

दुःख हे होणारच, वेदना या होणारच, त्यांचे आशीर्वाद पाठीशी राहतील परंतु त्यांचे प्रत्यक्ष दर्शन मात्र आता होणार नाही.

त्यांची आठवण आता आली की घनदाट जंगलामध्ये एखाद्या शांत तळ्याच्या काठी जाऊन बसले म्हणजे त्यांना भेटणे किंवा त्यांना पुन्हा अनुभवणे असे माझे मत आहे.

आणि काय लिहू? जंगलाचा माणूस कायमचा जंगलात विलीन झाला एवढेच मला वाटते.

..........................................

**** व्हॉटस् अप गृपवरुन साभार ****

## पक्षी जाय दिगंतरा...

-अनुष्का आशिष.

मारुती चितमपल्ली सर गेले... एक ज्ञानतपस्वी अनंतात विलीन झाला. सोलापूरला जाऊन त्यांना भेटावे असं सारखं वाटत असायचे. पण नाही झाली भेट.

चितमपल्ली सर हे व्यक्तीमत्व किती अफलातून होतं. त्यांची कितीतरी पुस्तके मी वाचली आहेत. Utube वरचे त्यांचे मुलाखत वजा व्हिडीओज पाहिलेत. त्यांचे बोलणे किती मृदू होते. किती आपलेपणाचे होते. जणू काही आपले आजोबाच आपल्याशी बोलत आहेत असं वाटते. मला त्यांना भेटायचे होते. त्यांच्याशी जंगलाच्या गुजगोष्टी करायच्या होत्या पण माझ्याच दुर्दैवाने ही भेट माझ्या भाळी लिहिली नव्हती याचं आयुष्यभर शल्य राहणार

मला जंगलाची अतिशय ओढ आहे. ही ओढ लागण्याचे कारण म्हणजे चितमपल्ली सर. निसर्ग हा आपल्या सख्यासोबत्या सारखा असतो. आप्पांच्या पुस्तकांमधून लागलेली निसर्गाची ओढ मला सरांच्या पुस्तकांतून जंगलाकडे घेऊन गेली. सरांना शोला फॉरेस्ट खूप आवडायची. ते त्यांना 'सावलीची झाडे' म्हणायचे. त्यांना प्राणी, पक्षी, जलचर, वृक्ष, नद्या यांचे ज्ञान अगाध होते. ते आयुष्यभर निसर्गात रमले.

निसर्गाच्या विविध पैलूंना स्पर्श केला. सूक्ष्म निरीक्षणशक्तीने आणि अभ्यासूवृत्तीने त्याचे आकलन करून घेतले. जंगलाच्या आदिवासींकडून प्राणी व पक्ष्यांचे अद्‌भुत ज्ञान मिळवले. कोकणातल्या कोळ्यांपासून जलचरांचे ज्ञान मिळवले. थोडक्यात ज्यांच्या कडून काही माहीती मिळू शकेल त्यांचा पाठपुरावा केला. त्यांचे Documentation केले. यावरून आठवले, सर जर परदेशात असते तर त्यांच्या नावाने म्युझिअम्स झाली असती. कारण जे ज्ञान आता पर्यंत लयाला गेले असते ते सरांमुळे अजरामर आहे. त्यांनी मराठी भाषेला हजारो नवीन शब्द दिले. त्यांनी लिहिलेल्या प्राण्यांच्या चित्तरकथा आपल्याला आश्चर्याने तोंडाचा आ वासायला भाग पाडतात. 'हे असं पण असू शकते का?' आपणच आपल्याला प्रश्न विचारतो... त्यांनी मत्स्यकोश, पक्षीकोश, वृक्षकोश लिहिले. कित्तेक पुस्तके लिहिली. जणू काही निसर्गशक्ती स्वतः त्यांना आपली रहस्य उघड करत असावी. त्यांची स्वतःची या निसर्गशक्तीवर, वनदेवतेवर अतोनात श्रद्धा होती. त्यांची ज्ञानलालसा अगदी उल्लेखनीय होती.

सोलापूरकर असलेले सर मूळचे तेलुगू भाषिक होते मात्र त्यांचे कार्यक्षेत्र हे बहुतांशी विदर्भ होतं. त्यांची आई त्यांचा पहिला गुरु होती. आईने त्यांना लहानपणी निसर्गाच्या गोष्टी सांगितल्या. पिढ्यानपिढ्या आलेल्या ज्ञानाचे कुंभ त्यांच्या आईने

त्यांच्यासमोर रिते केले. याचाच परिणाम म्हणून ते फॉरेस्ट ऑफिसर झाले. पुढे मावळ भागात कामावर असताना त्यांची भेट आप्पांशी झाली. आप्पांनी त्यांना निसर्गाकडे अधिक आत्मीयतेने बघायची प्रेरणा दिली. त्यांना लिखाणाला उद्युक्त केले. कोईंबतूर मध्ये झालेल्या शिक्षणापेक्षा अधिक प्रभावी शिक्षण सरांचे आप्पांकडून झाले. ज्ञानेश्वरीच्या विराण्या व तुकाराम महाराजांच्या गाथा वाचण्यास सांगितल्या. आप्पा त्यांची श्लोक पाठांतराची परीक्षा घ्यायचे. त्यातूनच संस्कृतची गोडी त्यांना लागली. पुढे विदर्भात सहस्त्रकुंडच्या जंगलात बदली झाल्यावर सर नांदेडला संस्कृत शिकले. त्यावेळी महाकवी कालिदास, भवभूती अभ्यासले. संस्कृत काव्यांतील विविध प्राणी- पक्षी- कीटक- वृक्ष यांचा अभ्यास केला. किती महद्‌ काम आहे हे!! सरांची कर्नाळ्याला बदली झाली तेव्हा अजून एक अफलातून व्यक्तीमत्व त्यांच्या आयुष्यात आले ते म्हणजे, डॉ. सलीम अली. त्यांच्याविषयी बोलताना सर सद्गगतीत होतात. सलीम अलींनी त्यांना पक्ष्यांची डायरी लिहायला सुचवली. ही सवय सरांना खूप उपयोगी ठरली. गुरुशिष्याची किती छान जोडी होती ही. पुढच्या बदलीत नवेगाव बांधला गेल्यावर त्यांना माधवराव पाटील भेटले. ते शिकारी होते. जिम कॉर्बेट यांच्याशी त्यांची तुलना होत असे. मात्र नंतर त्यांनी शिकार सोडून जंगल संवर्धनाशी निगडीत कार्य केले. चितमपल्ली सर आणि माधवराव पाटील यांची अगदी घट्ट दोस्ती होती. नवेगाव बांध येथील जलाशय, माधवराव पाटील, नागझिरा, धाबेपवनी, इटिया डोह अजरामर आहेत आणि राहतील. आजही आपल्याला पुणे- मुंबईला बसून भंडारा- गोंदिया लांब वाटतो. चितमपल्ली सर त्याकाळात तिथे जाऊन राहिले. इतरांना त्या भागात बदली म्हणजे जणू शिक्षा वाटायची. सर आवडीने तिथे गेले. एक मात्र झालं. आजच्या तुलनेने त्यांना फारच Raw Form मधील जंगल बघायला मिळाले. याबाबतीत सर अतिशय भाग्यवान होते. त्या काळात आपल्या मावळलाही बऱ्यापैकी जंगल टिकून होतं मग विदर्भात कसे विलक्षण जंगल असेल नाही? आजही तिथे अमाप wildlife आहे. सरांना अतिशय समृद्ध जंगलातील समृद्ध wildlife अनुभवायला मिळाले. असं एकही जंगल नाही की ते त्यांनी पाहिले नाही, अनुभवले नाही.

एकूण सोळा प्रकारची जंगले असतात. पानगळ, सदाहरित वन, वाळवंटी, उंच डोंगराळ, खाजणीची जंगले म्हणजेच mangroves, बर्फाळ प्रदेशातील अशी काही जंगले असतात. पूर्ण जगात, भारत असा एकमेव देश आहे की सोळाच्या सोळा प्रकारची जंगले आपण इथे अनुभवू शकतो. असं दुसऱ्या कोणत्याही देशात बघायला मिळत नाही. नवेगाव नंतर चिखलदरा, मेळघाटात त्यांची बदली झाली. प्रत्येक जंगल किती वेगळं असते. नवेगाव नंतर सातपुड्याच्या कुशीतील मेळघाटाच्या घनदाट अरण्यात सर येऊन राहिले. किती बहुरंगी आयुष्य ते जगले. त्यांना ज्याची आवड होती त्यातच त्यांनी करिअर केले. फार कमी लोकांच्या नशिबी हे सुख येते. मात्र, हे असलं तरी सर एक दुःख कवटाळून जगत होते. त्यांची पत्नी हे जग सोडून गेली आणि पाठोपाठ त्यांच्या एकुलत्या एक मुलीने सुद्धा आईचा मार्ग पत्करला. सर अगदीच एकाकी झाले.

यावर्षीचा प्रजासत्ताक दिवस एक अतिशय आनंददायक बातमी घेऊन आला. सरांना पद्मश्री पुरस्काराची घोषणा झाली. मनाला अपार आनंद झाला होता त्यावेळी. आता 29 मे ला तो त्यांना प्रदानही करण्यात आला. सर तेव्हाच अतिशय थकलेले दिसत होते. माझ्या मनात त्यांना लवकरात लवकरच भेटण्याची इच्छा परत जागी झाली. पण अजून महिनाही पूर्ण झाला नाही आणि सरांनी या जगाचा निरोप घेतला. जीवित असतानाच हा मान त्यांच्या वाट्याला आला याचे नक्कीच समाधान आहे. मरणोत्तर पुरस्काराला तसाही काही अर्थ नाही.

मेच्या शेवटच्या आठवड्यात आम्ही विदर्भात गेलो होतो. विदर्भकर्स किती भाग्यवान आहेत. पेंच, ताडोबा, नागझिरा- नवेगावबांध- कान्हा किसली- मेळघाट- सातपुडा- बांधवगड- पन्ना-रिवा किती किती जंगले त्यामानाने त्यांच्या जवळच आहेत. भंडारा जिल्ह्यातून फिरताना सरांची आठवण निघायला काही निमित्त लागलंच नाही. या ट्रिपमध्ये नवेगाव शक्य नव्हते. मात्र पेंचला फिरताना पिंगळा- पिंगळी, ब्राऊन इगल, ब्राऊन आऊल, बिबट्या, असंख्य रंगीबेरंगी फुलपाखरे, पावश्या पक्षी, नीलकंठ, नवरंग बघताना सर आठवणीत होतेच. त्यांनीच तर या रानवाटेवर आणून सोडले होते. केशराचा पाऊस किंवा आम्रवर्षा, माकडाचे तहानलाडू- भूकलाडू, अस्वलाच्या भाकरी, चकोर आणि चातक पक्षी, तणमोर, पांढरे उंदीर, शंख काय काय आठवतेय आता...

चितमपल्ली सर आपल्याला आपले बोट धरून जंगल फिरवून आणतात. आपण सुद्धा त्यांचे बोट अगदी घट्ट धरून ठेवतो. आता सर आपल्यात नाहीत पण पुस्तकांच्या रूपांनी ते इथेच आहेत. अजरामर राहतील. जो पर्यंत निसर्गावर- जंगलावर भरभरून प्रेम करणारी माणसे आहेत, निसर्गाचा आदर करणारी माणसे आहेत तो पर्यंत सर आपल्यातच वास करून आहेत... ते कुठेच गेले नाहीत. कारण निसर्गाचे बाळकडू त्यांनी आपल्याला पाजलंय मात्र तरीही त्यांना साश्रूपूर्ण डोळ्यांनी श्रद्धांजली अर्पण करतेय. अरण्यऋषी, आज जंगल पोरके झाले हो .

**An article by Shri. NA Pail ACF Retd. on late Mr. Maruti Chitampalli sir posted on Facebook group of SFRC Forest Officers on 4/1/2018.**

Mr.Maruti Chitamplli, IFS(retired),a legendary wildlife conservationist, ornithologist, naturalist & renowned writer. He is SFRCian of 1958-60 Batch.Born on 5/11/1932 at Sholapur in Maharashtra .Also had education in forests & wildlife at Bangalore, New Delhi,Dehardun, Kanha TR etc.He also sought traditional education of Sanskrit literature at Pune & Panvel. He is writer who achieved an ampreganable onenes with forests, wildlife & birds. His contribution of Karnala bird sanctuary, Nagzira sanctuary,Melghat TR & Navegoan N.P. is highly remarkable.Writen more than 20 Books on wildlife,foresrs & birds.Receipants of many awards from trusts & literature communs.He was President of prestgeous 79 the Akhil Bhartiya Marathi sahittya Sammelan held at Sholapur in 2006.

He retired as Dy CF.Melghat TR in 1990. He is staying at Nagpur. Let's wish him best wishes, long healthy life.

•◈•• ••◈••

## Memories from Dr. SH Patil

**While working as ACF Navegaon NP he had come to Navegaon 2-3 times in 1988-90 and I moved with him for a survey of otters in Itiadoh areas. He was speaking to local fishermen and taking keen notes of it. I visited Madhavrao Patil also with him. He was working in Melghats those days.**

**I met him last in 2021 to get his foreword for my poetry book 'Nisargache Jivan gane'. He was very happy to revive old memories and sat with him for 2-3 hours. His proposal for Padmshree was submitted then. Was to meet him after getting Padmashree. Congratulated him on the phone. Never knew that it was the last meeting. RIP**

•◈•• ••◈••

## आरोग्य साधना

एखाद्या समाजहिताच्या कार्यात स्वयंसेवक म्हणून काम करा.

▪ नियमित रक्तदान करा.

▪ समाजाचे ऋण मान्य करून परतफेड म्हणून सेवाभावी संस्थांना यथाशक्ती मदत करा.

▪ साधी रहाणी व उच्च विचारसारणी ठेवा.

▪ एक नवी परोपकार वही चालू करून त्यांत रोज केलेल्या एका तरी परोपकाराची नोंद करत जा.

▪ पैशांची व अन्नाची उधळपट्टी करू नका.

▪ लोणची, फरसाण असे खारवलेले पदार्थ जास्त खाऊ नका. त्यांत मोनोसाच्युरेटेड फॅटस् असतात जी आरोग्याला घातक असतात.

▪ भजी, वडे, कुरर्डया, पापड, पापड्या असे तेलकट पदार्थ जे आरोग्याला अपायकारक आहेत, कमी प्रमाणात खा.

▪ मैदा, मैद्याचे आणि बेकरीचे बिस्किटे, केक असे पदार्थ कमी प्रमाणात खा.

▪ बाजारान्त मिळणारे जंक व फास्ट फूड खाणे टाळा.

▪ श्रीखंड, बासुंदी, गुलाबजाम, लाडू असे मिठाईचे गोड पदार्थ मोजकेच खा व मनावर संयम ठेवा.

▪ अतिरिक्त चहा, कॉफी, एरिएटेड थंड पेये न पिता रवी खालचे ताजे अदमुरे गोडसर ताक, लिंबू सरबत, सोलकढी, कोकम, ताज्या फळांचे रस प्या.

▪ शिळे, नासलेले, आंबलेले अन्न व उतरलेली फळे खाऊ नका.

▪ बाजारात अस्वच्छ जागी उघड्यावर बनवलेले पदार्थ खाऊ नका. ▪ शेवग्याच्या शेंगा, कारली, कुळीथ, हादग्याची फुले, अळू, पुदिना, कढीपत्ता, मेथी, मुळा, पालक, कांदापात, लसूणपात, गवार, सुरण, लिंबू, कोथिंबीर, आले ह्या व अशा अनेक हर्बल भाज्यांचा त्यांचे गुणधर्म लक्षांत घेऊन जेवणात जाणीवपूर्वक वापर करावा.

▪ ऋतुमानानुसार आहारात योग्य बदल करत जावा.शक्यतो शाकाहारच घ्यावा. मांसाहार वर्ज्य करावा.

▪ जिभेला कायम लगाम घालून ताब्यात ठेवावे, तिचे जास्त चोचले पुरवत बसू नये. (लक्षात असू द्या की जीभ ज्याची आग्रहाने मागणी करते ते नेहमीच आरोग्यास अपायकारक असते)

▪ प्रकृतीस न झेपणारे उपास करू नयेत त्यांनी अपायच होतो.

▪ उपासाचे दिवशी उपासाचे म्हणून आपण जे खातो ते नेहमीच पित्त वाढवणारे व प्रकृतीस अपायकारक असतात.

▪ व्रत-वैकल्ये,उपास- तापास प्रमाणाबाहेर व प्रकृतीस न झेपतील असे करू नयेत.

▪ जेवणाच्या वेळा कटाक्षपूर्वक पाळाव्यात. ( नाहीतर ॲरसिडीटीचा त्रास होतो)

▪ आपल्याला ज्याची एलर्जी आहे आहे ते लक्षांत घेऊन असे पदार्थ आहारात टाळावेत.

▪ नियमितपणे व वक्तशीर राहून डॉक्टरांच्या सल्ल्याने शारीरिक तपासण्या करून घेत जा.

▪ तुमच्या व्याधींवर डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे / गोळ्या वेळचे वेळी न चुकता घेत जा व पथ्य पाळा.

▪ तुम्ही स्वत:च घरच्या घरी मनाने किंवा डॉक्टरांचा सल्ला न घेता कोणतीही औषधे घेऊ नका.मुदतबाह्य झालेली औषधे घेऊ नका.

▪ टि.व्ही. समोर बसून जेवण घेणे बंद करा. कुटुंबियांसमवेत जमिनीवर बसुन सर्व मिळून हास्य-विनोद करत जेवण घ्या.
▪ संगणकावर काम करत असणारांनी लाकडी (पूर्वी सरकारी कार्यालयात होत्या तशी) खुर्ची वापरावी खुर्चीवर ताठ बसावे, संगणकाच्या पडद्या पासून किमान १८" अंतर ठेवावे व दर तासाने तोंडावर थंड पाण्याचा मारा करून व डोळे धुवून घ्यावेत व थोडे चालून यावे.
▪ भ्रमणध्वनीचा (मोबाईलचा) अतिरिक्त वापर व वाहन चालवतांना वापर कटाक्षाने टाळावा. ▪ पंखे, ए.सी. यांचा अनावश्यक वापर टाळावा.शक्यतो थंड पाण्याने आंघोळ करणे उत्तम.
▪ लवकर निजा व लवकर उठा. जागरणे करणे टाळा.
▪ तेलकट, चमचमीत, मसालेदार, अत्यंत जहाल तिखट, जास्त गोड अशा पदार्थांचे सेवन करू नये.
▪ तुमच्या शारीरिक व्याधी लक्षात ठेऊन त्यानुसार पाथ्य-पाणी, औषधे याबाबत दक्षता घ्या.

•◈•• ••◈••

## वास्तव

### नवे वृध्दाश्रम नवी यातनाकेंद्रे ...!!!!

### स्वतःच्या घरातच बंदीस्त वृध्दाश्रम..😲

- सचिन मधुकर परांजपे यांचा हा लेख.

ज्यांनी आयुष्यभर खस्ता खाऊन, ओढग्रस्तीने संसार करत स्वतःच्या मुलाबाळांना वाढवले आहे... मोठे करुन स्वतःच्या पायावर उभे केले आहे.. अशा लोकांच्या अनेक मुलांनी अत्यंत हुशारीने वागून त्यांना वृध्दाश्रमाचा रस्ता दाखवला नाही, पण स्वतःच्या मुलांच्या जबाबदाऱ्या... म्हाताऱ्यांच्या अंगावर टाकून त्यांचा अनेकवेळा गैरफायदा घेतला आहे.. आणि घरातच नवे वृध्दाश्रम काढले आहेत. सोनेरी पिंजऱ्यात आई बापांना बंद करुन टाकले आहे आणि हक्काचे बिनपगारी नोकर बनवले आहेत....

आसपास घडणाऱ्या काही घटना बघितल्या की अक्षरशः अंगावर काटा उभा रहातो. माझ्या माहीतीमधील कित्येक मुलांनी म्हाताऱ्यांच्या वात्सल्याचा आणि प्रेमाचा गैरफायदा घेऊन, त्यांना Taken for granted धरुन स्वतःची मुले त्यांच्या जबाबदारीवर टाकून, स्वतःच्या करीअरकडे लक्ष दिले आहे. असते हो तुमचे..?"

साधारणतः साठी, पासष्टी नंतर मनुष्य मग तो स्त्री असो की पुरुष, इतक्या वर्षांच्या संघर्षाला थकलेला असतो, कंटाळलेला असतो, वैतागलेला असतो. मुले मोठी झालेली असतात, त्यांचे संसार सुरु झालेले असतात. या आयुष्याच्या संध्याछायेच्या कातरवेळी त्याला स्वत:साठी थोडा वेळ हवा असतो, विश्रांती हवी असते...पण नकळतपणे आणि अलगदपणे नातवंडांच्या जबाबदाऱ्या पुनश्च अंगावर येऊन पडतात आणि तो पुन्हा गुरफटला जातो....

म्हाताऱ्या आजीआजोबांना नातवंडांबद्दल अपार प्रेम आणि माया असते, नाही असे नाही. पण वयोमानामुळे, थकलेल्या शरीराने रोज नातवंडांना न्हाऊ माखु घालणे, जेवण देणे, त्यांच्या उस्तरवाऱ्या करणे, त्यांना हवे नको ते पहाणे हे शक्य होईलच असे नाही. पण मुलांच्या इमोशनल ब्लॅकमेल खाली दबून जाऊन त्यांना हे स्विकारणे भागच होऊन जाते. तोंड दाबून बुक्क्यांचा मार होतो.
सेटल झालेला बिझी मुलगा, बक्कळ पगाराची सुनबाई यांना करीअरमधुन वेळ नसतो,

मग आपल्या नातवंडांचे कसे होणार..? डे केअरमध्ये त्यांची देखभाल कोण आणि कशी करेल..? दिवसभराची मोलकरीण ठेवली तर ती मायेने करेल का..? असे अनेक प्रश्न म्हाताऱ्यांनाच पडतात आणि त्याभरात त्यांना स्वतःला न झेपणाऱ्या जबाबदाऱ्या स्विकाराव्या लागतात..... एकदा जबाबदारी स्विकारली की, मग स्वतःचे आरामाचे वैयक्तिक आयुष्य नातवंडांच्या दावणीला बांधले जाते... लफ्फेदार ड्रेस घालून सुनबाई कार घेऊन कामाला गेल्या की नातवाला किंवा नातीला ब्रेकफास्ट बनवून देणे, त्याचा डबा भरुन देणे, त्याला स्कूल बस पर्यंत सोडायला जाणे, इथपासून ते दुपारी आडनिड्या वेळेला नातू किंवा नात शाळेतून परत आली की स्वतःची वामकुक्षी टाळून त्याला आंघोळ घालणे, जेवायला देणे, झोपवणे ही कामे करावी लागतात. नातवंडांची इतकी प्रचंड काळजी घेऊनही जरा कुठे काही कमी जास्त झाले किंवा त्याची तब्येत बिघडली की ."लक्ष कुठे असते हो तुमचे..?" किंवा " तुमच्या आईनेच काहीतरी खाऊ घातले असेल माझ्या पोराला ..." असे खडे बोलही ऐकावे लागतात म्हाताऱ्यांना...

कधीकधी तर संध्याकाळी सून किंवा मुलगा आला की स्वतःचा लॅपटॉप उघडून बसतात आणि मग कधीकधी रात्रीच्या वेळी जेवणाचेही सासुबाईंनाच बघावे लागते.... सून असते हाय-क्वालिफाईड... त्यामुळे तिला बोलून चालणार नसते.. एखादा शब्द जर कमी जास्त झाला तर स्वतःचाच मुलगा डोळे वटारुन बघतो .... वर वर छान दिसणाऱ्या आयुष्यांचे हे असले सोनेरी बंदीस्त वृध्दाश्रम आता जागोजागी दिसायला लागले आहेत. इथे सर्व सुखे हात जोडून उभी आहेत, पण विश्रांती नाही, जबाबदाऱ्या संपलेल्या नाहीत. थकलेल्या शरीराला आराम नाही. अमेरिकेत मुलाकडे कौतुकाने गेलेले आईबाप चार महीन्यांनी उतरलेल्या चेहऱ्याने एअरपोर्टवर आलेले मी स्वत: बघितले आहेत. काल परवापर्यंत मुलाच्या अमेरीकन नोकरीचे कौतुक करणारे काका काकू यानंतर पुन्हा अमेरिकेला जायचे नावही घेत नाहीत, त्यामागेही हीच कारणे आहेत.

तुम्हाला मुले जन्माला घालून जर त्यांचे करणे झेपत नसेल तर एकतर नोकरीचा राजीनामा देऊन घरी बसा किंवा हृदयावर दगड ठेऊन मुलांना डे केअर सेंटरवर ठेवावे. तुमचं करीअर हेच जर तुम्हाला अतिशय महत्वाचे असेल तर मुलेच जन्माला घालू नका हे बेस्ट नाही का..? आपण जन्माला घातलेल्या मुलांची काळजी आपल्याच म्हाताऱ्या आईबापांवर सोपवून स्वतः करीअरच्या

नावाखाली नामानिराळे राहीलेल्या सुनामुलांची मला अक्षरशः कमाल वाटते. हे नवे "बंदीस्त सोनेरी वृध्दाश्रम"

आता साठीसत्तरीच्या वयातील वृध्दांसाठी यातनाकेंद्रे बनली आहेत असे माझे स्पष्ट मत आहे. आणि यातील दुर्दैव म्हणजे या वृध्दांचा होत असलेला कोंडमारा हा असह्य असला तरी त्याची घनता किंवा तीव्रता ही शब्दात व्यक्त करता येत नाही हा सर्वात मोठा त्रास आहे....!!!


सचिन मधुकर परांजपे (पालघर)

•◈••◈•

हृदयस्पर्शी....

**पाय जमिनीवर असणे म्हणजे काय त्याचे दर्शन.. व जिवंत उदाहरण...**

**पद्मश्री पुरस्कार देऊन ज्यांचा गौरव केला.. त्याबद्दलचे सत्कार - मुलाखती इ.होत असतांनाच आपण कुठून आलो याचे भान ठेवून जे रोजचा व्यवहार करतात ते खरे रोल मॉडेल...**



चैत्रामजी पवार (बारीपाडा ता.साक्री जि.धुळे) यांचा जळगाव बसस्टॅन्डवरचा फोटो

ᘏᘏᘏᘏᘏ⊛ᘏᘏᘏᘏᘏ

## डॉ. जयंत नारळीकर......

## अत्यंत साध्या जगण्याची गोष्ट !

### लेखिका: श्रीमती . कल्याणी गाडगीळ

आकाशगंगा या आयुकाच्या (म्हणजे Inter University Centre for Astronomy and Astrophysics - IUCAA) हाउसिंग कॉलनीमध्ये राहायला गेले तेव्हा डॉ. जयंत नारळीकर व सौ. मंगला नारळीकर यांच्या समोरचेच घर माझ्या भाग्याने मला मिळाले. असा दुर्मिळ शेजार आम्हाला लाभला होता. डॉ. नारळीकरांची एक्झिक्युटिव्ह सेक्रेटरी म्हणून सुमारे दहा वर्ष काम करण्याची संधी मिळाली आणि त्यांचे शेजारी म्हणून राहण्याचीही. सरांचे नाव आणि कीर्ती इतकी मोठी की नव्याने कामाला सुरुवात केली तेव्हा त्याचे दडपणच मनावर अधिक होते. पण सर वागायला इतके साधे की कित्येकदा त्यावर विश्वासच बसत नसे.

ऑफिसमध्ये ते वेळेआधी दहा मिनिटे पोहचलेले असत. घड्याळाच्या काट्याबरहुकूम मेल पहाणे, मेलला उत्तरे म्हणून डिक्टेशन, पत्रे टाइप झाली की सह्या, रोज कोणत्यावेळी कोण येणार यासंबंधीचा दिवसाचा आराखडा त्यांच्यासमोर दिला जाई. त्यानुसार ते त्या त्या संबंधीचे कागदपत्र मागवून स्वतःजवळ ठेवून घेत.

सरांच्या भेटीला येणाऱ्या लोकांमध्ये देशोदेशीचे शास्त्रज्ञ, सरकारी अधिकारी, विद्यापीठातील मान्यवर, देशी- परदेशी विद्यार्थी, त्यांच्या हाताखाली शिकणारे विद्यार्थी, आयुकातील अधिकारी यांच्याबरोबरच खेडेगावातून आलेले विद्यार्थी व त्यांचे पालक अशी विविधता असे. पण सर्वांना सारख्याच सन्मानाने वागविले जाई.

एकदा एका खेडेगावातल्या विद्यार्थ्याला भेटायला पाच मिनिटे उशीर झाल्याने अस्वस्थ होऊन एक एक पायरी गाळून भराभर वर आलेले सर मला अजून आठवतात.

विविध वर्तमानपत्रे, मासिके इत्यादि ठिकाणी त्यांचे लेख छापून येत. त्यांनी लेख देण्याचे कबूल केले की ठरलेल्या तारखेच्या आधी सुमारे 15 दिवस लेख पूर्ण झालेला असे व तो हस्तलिखित लेख पाठविण्यासाठी मजकडे येई. अक्षर इतके सुंदर आणि लेखात एकाही ठिकाणी - अक्षरशः एकाही ठिकाणी- कधीही खाडाखोड नसे. खरे तर कित्येकदा वाटे लेख मराठी असो वा इंग्रजी - टाइप करण्याऐवजी त्यांच्या अक्षरातच छापावा!

उत्तरे डिक्टेट करताना त्यांचे बारकाव्यांकडे असलेले लक्ष मला चकित करीत असे. एकदा त्यांनी मला सांगितले कोणताही शब्द संक्षिप्त स्वरूपात वापरण्यासंबंधीचा एक नियम आहे. उदा. Professor या शब्दाचे संक्षिप्त रूप Prof. करताना त्याच्यापुढे पूर्णविराम दिलाच पाहिजे कारण त्या संक्षिप्त रूपात त्या शब्दाची पहिली काही अक्षरेच घेतली आहेत; पण Doctor या शब्दाचे संक्षिप्त रूप Dr करताना पुढे पूर्ण विरामाची गरज नसते कारण त्यात Doctor या शब्दातील पहिले D शेवटचे r हे अक्षर वापरलेले आहे. हे मी शाळेत किंवा पुढे विद्यापीठातही कधीच शिकले नव्हते.

सरांना कामासाठी देशी-विदेशी दौरे करावे लागत. त्यावेळी त्यांचे संपूर्ण वेळापत्रक तारखेनुसार व त्या त्या दिवसाच्या वेळेनुसार टाइप केले जात असे. त्यातही त्यांनी केलेली एक अप्रतिम सोयीची गोष्ट विसरणे केवळ अशक्य. जिथे जिथे भेट ठरलेली आहे त्या त्या संस्थेचा पत्ता, फोन क्रमांक, इ-मेल पत्ता, गावाचे पूर्ण नाव व पिनकोड तसेच ज्या व्यक्तीला भेटायचे आहे त्या व्यक्तीचेही पूर्ण नाव, अधिकारपद, कार्यालयाचा तसेच असल्यास घरचा फोन क्रमांक, इ-मेल इत्यादी गोष्टी टाइप करून ते सर्व कागद एका आकारात कापून त्याला जरासे जाड कागदाचे कव्हर करून त्याचे शर्टाच्या खिशात किंवा पाकिटात सहजपणे मावेल अशा आकाराचे लहानसे पुस्तक त्यांनी मला करायला सांगितले होते. त्याची नंतर सवयच होऊन गेली.

कोणताही पत्ता, फोन शोधण्यात विलंब लागू नये म्हणून ही खबरदारी. गंमत म्हणजे ते प्रवासाहून परत आले की पत्त्याच्या संदर्भातील काही बदल असेल तर त्यांच्या छोटेखानी पुस्तकात तो टिपलेला असे व त्यामुळे

माझ्याजवळ असलेल्या पत्त्यात त्यानुसार बदल करणेही सोपे जाई व सर्व माहिती अद्ययावत राहात असे.

प्रवासाच्या वेळी कधी विमान किंवा ट्रेन उशिरा निघणार आहे म्हटले तर सर त्यांच्याकडे असलेल्या पोस्टकार्डावर किंवा आंतर्देशीय पत्रांवर त्यांना आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे लिहायला सुरुवात करीत.

विद्यार्थी सरांना भेटले की त्यांची स्वाक्षरी मागत. सर त्यांना सांगत " नुसती सही देण्यापेक्षा तुम्ही पत्राने एखादा प्रश्न विचारा. त्याचे उत्तर मी तुम्हाला पाठवीन आणि त्यावर माझी सही असेल " हा शास्त्रशुद्ध विचारांचे बीज लहानपणापासून रुजविण्या संदर्भात केलेला सततचा आग्रहच!

आयुकासारख्या संस्थेचे डायरेक्टर म्हणून काम करणे, सकाळी दणकून टेनिस खेळणे, शिकविणे, विविध ठिकाणी प्रमुख पाहुणे म्हणून जाणे, स्वत:ची पुस्तके लिहिणे, लेख लिहिणे, मराठी विज्ञान परिषदेचे काम पहाणे, समाजात विज्ञानदृष्टी यावी यासाठीचे अव्याहत प्रयत्न, - पंचमहाभूते - यांसारख्या विषयावर आयुकात शिबिर घेणे, व्याख्याने देणे. सतत इतके बिझी असूनही सर कधी 'ओव्हर टाइम' करत ऑफिसात थांबल्याचे मला आठवतच नाही. क्वचित कधी इतर आलेल्या अधिकाऱ्यांमुळे विलंब झाला तरच!

आयुकामध्ये असताना आमच्या 'आकाशगंगे'त होळी, दिवाळी असे सण साजरे होत. सरांना गुलाल माखताना संकोचल्यासारखे होई पण ते मात्र एकदम शांतपणे उभे रहात असत. दिवाळीचे जेवण आयुकाच्या कॅण्टीनमधून तयार होऊन येई. पण लक्ष्मीपूजनाच्या दिवशीच ते असल्यामुळे ताटे-वाटी-पेले ज्याचे त्याचे घरून आणणे आवश्यक होई. कारण भांडी धुवायला कॅण्टीनमधली मुले नसत. 8 वाजता जेवणाची वेळ ठरलेली असेल तर 8ला पाच कमी असतानाच सर हातात ताट-वाटी घेऊन इतर सर्वांसारखे हजर.

आयुकात काम करणाऱ्या लोकांच्या व्यक्तिगत छंदांविषयीसुद्धा ते जागरूक असत. त्यांना देशोदेशीहून येणाऱ्या पत्रांवर परदेशी तिकिटे असत. त्यातील तिकिटे ते न विसरता कापून आणून माझ्याकडे देत व 'अमुक अमुक व्यक्तीला हे द्या' असे आवर्जून सांगत. एखाद्याचे एखाद्या वाचनासंबंधीचे वेड त्यांना ठाऊक असे व त्यासंबंधी काही लेख, माहिती आल्यास ते ती त्या व्यक्तीपर्यंत न विसरता पोहचवीत.

एकदा त्यांच्या घरी निरोप सांगायला गेले तेव्हा सर किंवा मंगलाताई दोघेही घरी नव्हते. सरांच्या सासूबाई स्वयंपाकघरात होत्या. त्यांच्याकडे निरोप दिला. तेव्हा त्या भांडी जागेवर लावण्यात गुंतल्या होत्या. मला म्हणाल्या, 'पाहिलीत का आमच्या जावईबापूंची करामत?' म्हटले, 'काय झाले?' तर त्या म्हणाल्या, 'काल आमच्या घरी 15-20 माणसे जेवायला होती. सरांना कामानिमित्त बाहेर जावे लागल्यामुळे त्यांना मंगलाला कोणतीच मदत करता आली नाही. म्हणून रात्री जेवणे उरकल्यानंतर त्यांनी ही सगळी काचेची नाजूक भांडी, प्लेट्स धुवून ठेवली आहेत.' 'एल' आकाराच्या दोन ओट्यावर केवढी मोठी भांडी, प्लेट्स इत्यादी धुवून ठेवलेली होती ! आपला कामाचा वाटा चुकवू नये हे त्यांच्या रक्तातच भिनलेले! आपला कामाचा काही वाटा घरकामातही असतो हे मन:पूर्वक मानणारे सरांसारखे किती मान्यवर पुरुष तुम्हाला भेटतील?

सरांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांना कोणतीही शंका - अगदी कोणतीही शंका विचारली तर त्यासंबंधी उपहास न करता ते अत्यंत सोप्या पद्धतीने त्याचे उत्तर देत. गणपतीने म्हणजे गणेशमूर्तीने दूध प्यायल्याची अफवा देशभर पसरली होती तेव्हाचा प्रसंग. सरांना यासंबंधी प्रश्न विचारण्यासाठी आयुकामध्ये एकावर एक फोन येऊ लागले. शेवटी सरांनी मूर्तीच्या सोंडेने प्रत्यक्ष दूध कसे खेचले जाऊ शकते यासंबंधीची शास्त्रोक्त माहिती सांगणारे छोटेखानी भाषण केले व ते लोकांपर्यंत पोचवले. वैज्ञानिक विचारांचा अखंड पाठपुरावा जणू रक्तात भिनलेला!

आयुकाच्या इमारतीचे बांधकाम चालू असताना आयुकाच्या आवारात न्यूटन, आइनस्टाइन, आर्यभट्ट, गॅलिलिओ इत्यादी पुतळे ठेवण्यात आले. फूको पेंडयूलम (**foucault pendulum**) सौरघड्याळ इत्यादी शास्त्रीय माहिती देणारी उपकरणेही ठेवली गेली. अनेक विद्यार्थ्यांच्या ज्ञानात या गोष्टी पाहण्यानेसुद्धा भर पडते. या सर्वांमध्ये सरांनी दाखवलेली खरी रसिकता म्हणजे आयुकाच्या कॅण्टीनमध्ये लावलेला एक बोर्ड - **'The discovery of a new dish does more for human happiness than the discovery of a star!' - by Brillat Savarin** - हे ते वाक्य, जीवनाबाबतीतले सत्य सांगणारे !

कॅण्टीनमध्ये लावण्यासाठी हे वाक्य निवडणारा माणूस स्वत: आंतरराष्ट्रीय ख्यातीचा शास्त्रज्ञ आहे, हे विशेष!

अंतराळ विज्ञानातल्या सरांच्या अजोड कामगिरी खेरीजचे हे किती विविध गुण !

माणसे मोठी होतात; ती उगीच नाही !!

- कल्याणी गाडगीळ

## 'व्हिएन्ना आणि बरचं काही' श्री अरविंद आपटे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

पुणे दि.१८/०४/२०२५ श्री अरविंद आपटे सेवानिवृत्त मुख्य वनसंरक्षक यांच्या 'व्हिएन्ना आणि बरचं काही' या पुस्तकाचे वनभवन पुणे येथे श्री. मो. ह. खेडकर, सेवा निवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे हस्ते व श्री एन आर प्रवीण , मुख्य वनसंरक्षक पुणे यांच्या विशेष उपस्थितीत प्रकाशन संपन्न झाले.

यावेळी श्री. आपटे यांनी या पुस्तकाबद्दल बोलतांना त्यांच्या युरोप दौऱ्यातील अनुभव कथन केले. या कार्यक्रमास अनेक वनअधिकारी व त्यांची मित्रमंडळी हे मोठ्या संख्येने हजर होते. हे पुस्तक उप वन संरक्षक, पुणे कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहे.

### वाचक प्रतिक्रिया

## सेवक वार्ता, मे-२०२५

ग्रीष्म ऋतुत सुध्दा मन शांत व शीतल करणार्या मे,२०२५ सेवक वार्ता अंकाचे स्वागत. –व्ही.टी. पत्की

धन्यवाद. उत्तम सेवक वार्ता -व्ही. बी. सावरकर

केवळ खाजगी वितरणासाठी

प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे

संपादन - एस. के. गवळी

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६